महासागर

पालघर

मंगळवार, २४ जून २०२५

# वर्सोवा पुलावरून टँकर खाडीत कोसळला; चालकाचा मृत्यू

**भाईंदर, दि. २३ : प्रतिनिधी**



मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गांवरील वसई कडून ठाण्याला जाणाऱ्या मार्गीकेवर वर्सोवा पुलावरील लोखंडी रेलिंगचा कठाडा तोडून (GJ-10-TX-4191) हा टँकर खाडीत कोसळल्याची घटना सकाळी ११. ३० च्या सुमारास घडली आहे.गुजरात वरून माल भरून टँकर ठाण्याच्या दिशेने जात असताना सदर घटना घडली आहे.या घटनेत टँकर चालक मुना धर्मदेव चौहान (राहणार गोरेगाव) याचा मृत्यू झाला असून टँकरचा शोध घेऊन पाण्यातून बाहेर काढण्यात आला.

मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गांवर सकाळी ११.३०च्या सुमारास वर्सोवा पुलावर टँकर ठाण्याच्या दिशेला जात असताना सोमरच्या ट्रेलरला मागून धडक बसल्या नंतर त्याचा टँकर वरील ताबा सुटल्याने पुलाच्या कडेला सुरक्षे करता लावण्यात आलेल्या लोखंडी ग्रीलला धडक लागून टँकर खडीत कोसळल्याची घटना घडली आहे.

घटने नंतर टँकर चालक पाण्यातुन स्वतःला वाचवण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे समजताच पुलावरून जाणारे वाहन चालक व घटना स्थळी उपस्थित पोलीस यांनी दोरी टाकत पाण्यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करत होते. मात्र पाण्याचा प्रवाह अधिक असल्याने त्यांच्या प्रयत्नांना यश आले नाही. त्यानंतर पोलिसांनी बोटीच्या मार्फत चालकाचा शोध घेत त्याला पाण्याच्या बाहेर काढण्यात आले .मात्र या अपघातात त्याचा मृत्यू झाला असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

टँकर पाण्यात पडल्या नंतर अद्याप मिळून न आल्याने बोट, पानबुडी, अग्निशमन दल, वाहतूक व काशिगाव पोलीस यांच्या मदतीने टँकर बाहेर काढण्यात आला.

# भात खरेदी करा, मगच खत मिळेल

## कृषी केंद्राचा अजब फतवा; शेतकऱ्यांची अडवणूक, प्रशासनाचे दुर्लक्ष

**डहाणू, दि. २३ : प्रतिनिधी**

डहाणू तालुक्यातील कासा येथे असलेल्या भरत कृषी केंद्राचा अजब कारभार समोर आला आहे. या कृषी सेवा केंद्रात खरेदीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांना "भात खरेदी केली तरच खत दिले जाईल" असा अजब फतवा जारी करण्यात आल्याचा आरोप स्थानिक शेतकऱ्यांकडून करण्यात आला आहे. यामुळे भात पेरणीच्या तोंडावर संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे.

पालघर जिल्ह्यात पावसाळ्याची सुरुवात झाल्याने अनेक भागात भात पेरणीला वेग आला आहे. मात्र, पेरणीपूर्व तयारीसाठी लागणाऱ्या खतांची खरेदी करताना शेतकऱ्यांना कृषी केंद्रांकडून अडवणूक केली जात असल्याचे धक्कादायक चित्र समोर येत आहे. शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, बियाणे त्यांनी आधीच राखून ठेवलेली असून त्यांना केवळ खताची गरज आहे. मात्र, स्थानिक कृषी केंद्राकडून "आमच्याकडून भात घेतला तरच खत दिले जाईल" अशी अट घालण्यात येत आहे. इतकेच नाही तर काही कृषी केंद्रांमध्ये खतांच्या पॅकेट्सवर छापलेल्या एमआरपीपेक्षा अधिक दराने विक्री होत असल्याचाही आरोप शेतकऱ्यांकडून करण्यात आला आहे.



या सर्व प्रकारावर कृषी विभागाचे दुर्लक्ष असल्याचे शेतकरी सांगत आहेत. आम्ही कृषी विभागाकडे तक्रार केली, तरी कुणीच ऐकत नाही. उलट कृषी केंद्राच्या बाजूनेच बोलले जाते, असा संताप अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. कृषी विभागाच्या म्हणण्यानुसार, आम्ही प्रत्येक गावात कृषी सेवक नेमले असून शेतकऱ्यांच्या तक्रारी आल्या तर कारवाई केली जाईल. मात्र, प्रत्यक्षात या सेवकांकडून काहीच कारवाई होत नसल्याचा अनुभव शेतकऱ्यांचा आहे. त्यामुळे कृषी केंद्रांच्या मनमानी कारभाराला प्रशासनच पाठीशी घालत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शासनाने व कृषी विभागाने या गंभीर प्रकाराची तातडीने दखल घेऊन दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून होत आहे. अन्यथा याचा फटका संपूर्ण खरीप हंगामाला बसण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

भात बियाणे घेतल्याशिवाय खत दिले जाणार नाही, असा प्रकार कासा येथील भरत कृषी केंद्र येथे सुरू असल्याचा प्रकार एका शेतकऱ्याने उघड केल्यानंतर या प्रकाराविषयी डहाणूचे प्रभारी तालुका कृषी अधिकारी आर. बि. ईभाड यांना विचारले असता त्यांनी दिशाभूल करत विषयाला बगल देत खताच्या किंमतींवर माहिती देत जर दुकानदार छापील किंमतीपेक्षा अधिक किंमतीने खत विक्री करत असल्याचा पुरावा असेल तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे उत्तर दिले. मात्र, मूळ विषयावर बोलण्याचे टाळले. त्यामुळे अश्या मनमानी करणाऱ्या कृषी दुकानदारांना अधिकारीच पाठीशी घालत असल्याचे चित्र असल्याने या दुकानदारावर नेमकी काय कारवाई होणार ?, असा प्रश्न शेतकरी उपस्थित करत आहेत.

# लोकल ट्रेनमधील मारहाणप्रकरणी गुन्हा दाखल

## पाच हजार रुपये घेतल्याच्या आरोपानंतर कारवाई; रेल्वे पोलिस आयुक्तांकडून चौकशी सुरु

**वसई, दि. २३ : प्रतिनिधी**

17 जून रोजी चर्चगेट-विरार लोकल ट्रेनच्या महिलांच्या डब्यात कविता मेंदाडकर (33) आणि ज्योती सिंग (27) दोन महिलांमध्ये वाद झाल्यानंतर ज्योती सिंग हिने कविता मेंदाडकरला मारहाण केली होती. मात्र, वसई रोड रेल्वे पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याऐवजी पाच हजार रुपये घेऊन गुन्हा दाखल केला नाही, अशी तक्रार केल्यावर ज्योती सिंगविरोधात रविवारी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रेल्वे पोलीस आयुक्तांनी यात हस्तक्षेप केल्याने कारवाई करण्यात आली असून याप्रकरणी चौकशीदेखिल सुरु करण्यात आली आहे. विरारमधील फुलपाडा येथे राहणाऱ्या कविता मेंदाडकर (३३) यांनी १७ जून रोजी सायंकाळी त्यांनी विरारला जाण्यासाठी मिरारोड रेल्वे स्थानकातून रात्री ७ वाजून ५७ मिनिटांची चर्चगेट-विरार महिला विशेष लोकल पकडली होती. त्यावेळी दारात उभ्या असलेल्या ज्योती सिंग (२७) या महिलेशी त्यांचा वाद झाला. शाब्दिक वादाचे पर्यवसान हाणामारीत झाले. यावेळी ज्योतीने कविता यांचे केस ओढून डोक्यात मोबाईल मारला. त्यामुळे कविता यांच्या डोक्याला जखम झाली आणि त्या रक्तबंबाळ झाल्या. तरीही वसई रोड रेल्वे पोलिसांनी गुन्हा दाखल केला नव्हता. या हाणामारीची चित्रफित समाजमाध्यमांवर प्रसारीत झाल्यानतंर हा प्रकार उघडकीस आला. वसई रेल्वे पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल न करता ५ हजार रुपये घेऊन तडजोड केल्याचा आरोप मारहाण झालेल्या कविता मेंदाडकर या महिलेने केला होता. याची माहिती मिळताच रेल्वे पोलिस आयुक्त राकेश कलासागर यांनी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. तसेच रक्तबंबाळ होऊनही गुन्हा दाखल न करणे, ५ हजार रुपये घेऊन तडजोड करणे या कविता मेंदाडकर यांच्या आरोपांमुळे यामुळे वसई रेल्वे पोलिसांचे धाबे दणाणले होते. मनसेनेही याप्रकरणी वसई रेल्वे पोलिसांना जाब विचारला होता. अखेर शनिवारी पोलिसांनी दोन्ही महिलांना बोलावून त्यांचे जबाब नोंदवून घेतले. कविताची तक्रार घेऊन मारहाण करणाऱ्या ज्योती सिंग (२७) या महिलेविरोधात प्राणघातक शस्त्राने हल्ला करणे, सार्वजनिक शांतता भंग करणे आदीसाठी भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८ (१) आणि ३५२ अंतर्गत गुन्हे दाखल केले आहे. कलम ११८ (१) अंतर्गत १० वर्षांपर्यंतच्या शिक्षेची तरतूद आहे तर कलम ३५२ अंतर्गत २ वर्ष कारावास आणि दंड किंवा दोन्हीची तरतूद आहे.

दरम्यान, रेल्वे पोलीस आयुक्त राकेश कलासागर यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून चौकशीचे आदेश दिले आहेत. गुन्हा का दाखल केला नाही, तसेच तडजोडीच्या आरोपाबाबत रेल्वे पोलिसांकडून खुलासा मागवण्यात आला आहे. रविवारी सायंकाळी रेल्वे पोलीस मुख्यालयात पीडित आणि आरोपी महिलांना जबाब नोंदवण्यासाठी बोलावण्यात आले होते.

## उशिरा लोकलमुळे बदलापुरातील प्रवासी त्रस्त

### विलंबाचा फटका चाकरमान्यांना

**बदलापूर, दि.२३ : प्रतिनिधी**

उशिरा लोकलमुळे बदलापुरातील प्रवाशांनी रेल्वे रुळावर उतरून संताप व्यक्त केला आहे. रोजच उशिरा लोकलमुळे कार्यालयात पोहोचण्यास उशीर होत असल्याने लेट मार्क लागत आहे. त्याचा परिणाम महिन्या शेवटी पगारात दिसत आहे. त्याबद्दल प्रवाशांनी संताप व्यक्त करत स्टेशन व्यवस्थापकाच्या कार्यालयात जाऊन जाब विचारला आहे. काही प्रवासी रेल्वे रुळावर उतरले. बदलापूर रेल्वे स्थानकातून सकाळी तीन वाजल्यापासून लोकल गाड्या मुंबईच्या दिशेने जाण्यास सुरूवात होते. त्यातील सुरूवातीच्या चार लोकलगाड्या या कर्जत स्थानकातून सुटतात. यात ३ वाजून ३ मिनिटांची, ४ वाजून ७ मिनिटांची, ५ वाजताची आणि ५ वाजून २५ मिनिटांची लोकल कर्जतहून सुटते. तर ५ वाजून ४० मिनिटांची पहिली लोकल मुंबईसाठी बदलापूर स्थानकातून सुटते. या ५ वाजून २५ मिनिटांची आणि त्यानंतरची ५ वाजून ४० मिनिटांची लोकल गेल्या काही दिवसांपासून सातत्याने उशिराने धावत असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. शनिवारीही ही लोकल २० ते २५ मिनिटे उशिराने धावत होती. त्यामुळे प्रवाशांचा संताप वाढला. परिणामी प्रवाशांनी स्थानक व्यवस्थापक यांचे कार्यालय तसेच रेल्वे रूळावर उतरून संताप व्यक्त केला.

# मुसळधार पावसाने विक्रमगड तालुक्याची दैना

## अनेक पूल पाण्याखाली, जनजीवन विस्कळीत

**जव्हार, दि. २३ : प्रतिनिधी**



रात्रीपासून कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे विक्रमगड तालुक्यातील नदी, ओहोळ पाण्याने दुथडी भरून वाहत आहेत. नद्यांना, नाल्यांना पूर आल्याने तालुक्यातील अनेक भागाचा संपर्क तुटला असल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. तसेच वाहतुकीवरही परिणाम झाला आहे.

मुसळधार पावसामुळे ओहोळ, नाले, नदींना पूर आला आहे. देहर्जे नदीवरील पूल पाण्याखाली गेला असून शीळ–देहर्जे रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. सारशी गावाजवळील ओहोळवरच्या मोरी पूलावरून पाणी वाहत असल्याने सारशी-शोळशेत रस्ता वाहतूकीसाठी बंद झाला आहे. कुरंझे–कंचाड रस्त्यावरील पूल पाण्याखाली गेल्याने यारस्त्यावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. विक्रमगड तालुक्यातील पावसाच्या तडाख्याने नदी-नाले-ओढ्यांना पूर आले असल्याने वाहतूक ठप्प झाली आहे. तालुक्यातील पूरस्थिती पाहता प्रशासनाने नागरीकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

# सफाई कर्मचाऱ्यांना पीपीई कीटचे वाटप

**भाईंदर, दि. २३ : प्रतिनिधी**

मीरा भाईंदर महापालिकेने सफाई कर्मचाऱ्यांना केंद्र सरकारच्या निर्देशानुसार पीपीई किटचे वाटप केले. तसेच कर्मचाऱ्यासाठी आयुष्यमान भारत कार्ड नोंदणी प्रक्रियाही सुरु केली आहे. साफसफाई कामगारांच्या सुरक्षितता, सन्मान आणि समावेशासाठी केंद्र सरकारने २०२२ मध्ये सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालय आणि गृहनिर्माण व नगरविकास मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने 'NAMASTE' (National Action for Mechanised Sanitation Ecosystem) ही योजना सुरु केली आहे. या योजनेची अंमलबजावणी राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त आणि विकास महामंडळ (NSKFDC) यांच्या माध्यमातून होत आहे. गटार व सांडपाणी साफसफाईचे धोकादायक मॅन्युअल काम पूर्णतः समाप्त करणे..यांत्रिक साफसफाई उपकरणांचा वापर प्रोत्साहन देणे. साफसफाई कामगारांना सुरक्षाकवच, आरोग्य सेवा, कौशल्यविकास आणि सामाजिक सुरक्षा प्रदान करणे, हे



नमस्ते योजनेचे उद्दीष्ट आहे. योजनेचा पहिला टप्पा गटार, सेप्टिक टँक साफ करणारे मजूर (SSWs) यांच्यासाठी होता. या अंतर्गत, मिरा भाईंदर महानगरपालिकेने कार्यरत मजूरांचे वैयक्तिक, आरोग्य विषयक आणि रोजगाराशी संबंधित माहिती संकलित करून राष्ट्रीय MIS प्रणालीमध्ये यशस्वीपणे नोंदवली आहे. योजनेच्या पुढील टप्प्यात महापालिकेला NSKFDC कडून ११६ पीपीई किट्स प्राप्त झाले असून, सदर किट्स सफाई मित्रांना वाटपाचा कार्यक्रम मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालयात आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ.शर्मा यांच्या निर्देशानुसार शहर अभियंता दिपक खांबीत यांच्या उपस्थितीत पार पडला. या किट्समुळे कामाच्या ठिकाणी सुरक्षितेत वाढ होणार असून, ही पावले सफाई मित्रांच्या आरोग्याचा आणि हक्कांचा सन्मान करणारी आहेत. तसेच, महापालिकेने नमस्ते योजनेच्या मार्गदर्शनाखाली ' आयुष्मान भारत कार्ड' नोंदणी प्रक्रिया सुरू केली आहे. सध्या ८ कामगारांची यशस्वी नोंदणी झाली असून, त्यांना आणि त्यांच्या कुटुंबांना कॅशलेस आरोग्य सेवा मिळण्याचा मार्ग खुला झाला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत साफसफाई कामगारांसाठी नित्य आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जात आहेत. सुरक्षित कामकाजाविषयी जागृती सत्रे घेतली आहे. काम करीत असताना घ्यावयाची दक्षता याविषयी मार्गदर्शन शिबिर घेतले जातात. यांत्रिक साफसफाईत प्रत्यक्ष प्रशिक्षण दिल्यामुळे टप्प्याटप्प्याने हाताळणी (manual intervention) कमी होण्यास मदत होणार आहे.तसेच सफाई कर्मचारी यांचे आरोग्य संवर्धन होऊन नक्कीच त्यांच्या कार्यात गतिमानता येईल, असे मत महापालिका आयुक्तांनी व्यक्त केले आहे.

# दोन खासदार, एक आमदार खड्डे बुजवण्यासाठी रस्त्यावर

## वाडा -भिवंडी रस्त्याची दुरवस्था; प्रशासनाच्या निषेधार्थ श्रमदान

**वाडा, दि. २३ : प्रतिनिधी**

भिवंडी- वाडा-मनोर रस्त्यावर प्रचंड खड्डे पडले असून ठेकेदाराने संथगतीने रस्त्याचे काम सुरू ठेवल्याने पावसाळ्याच्या सुरुवातीलाच मोठ मोठे खड्डे पडल्याने वाहतूक कोंडीचा सामना करत खड्ड्यांमधून सर्व नागरिकांना जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. प्रशासन दाद देत नसल्याने पालघरचे खासदार डॉ. हेमंत सवरा, भिवंडीचे खासदार सुरेश म्हात्रे आणि आमदार शांताराम मोरे यांनी रस्त्यावर उतरून प्रतिकात्मक श्रमदान करत प्रशासनाचा निषेध केला. मनोर -वाडा -भिवंडी या रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे. पावसाळ्यापूर्वी रस्त्याची किमान एक बाजू पूर्ण होईल, अशी अपेक्षा होती. लोकप्रतिनिधींनीही तशी आश्वासने दिली होती. मात्र प्रत्यक्षात पावसाळा सुरू झाला



तरी या रस्त्याचे काम संथगतीने सुरू आहे. त्यामुळे या रस्त्यावर पडलेल्या प्रचंड खड्ड्यांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. या संदर्भात सामाजिक कार्यकर्त्या प्रमोद पवार यांनी रस्त्यावर उतरून व्हिडिओ काढून तो प्रसारित करत प्रशासनाला जाब विचारला. त्यानंतर पालघरचे खासदार डॉ. हेमंत सवरा, भिवंडीचे खासदार सुरेश म्हात्रे आणि आमदार शांताराम मोरे यांनी स्वतः श्रमदान करत रस्त्यावरील खड्डे भरत प्रतिकात्मक आंदोलन केले. प्रशासनाने येत्या आठ दिवसात खड्डे भरले नाहीत तर शिवसेना उपनेते प्रकाश पाटील( शिंदे गट) , आमदार शांताराम मोरे हे स्वःखर्चाने खड्डे भरतील असे आश्वासन दिले आहे.

### खासदार, आमदारांच्या खड्डे भरण्यावर नागरीकांची टिका

खासदार आणि आमदारांनी प्रशासनाकडून खड्डे भरून घेण्याचे काम करायला हवे होते. पण, प्रसिध्दीसाठी त्यांनी श्रमदानाचा फार्स केल्याची टिका केली जात आहे. खासदार सवरा भाजपचे तर आमदार शांताराम मोरे शिंदे गटाचे आमदार आहेत. असे असताना सत्ताधारी पक्षांच्या लोकप्रतिनिधींना रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी आंदोलन करावे लागते ही लाजिरवाणी बाब असल्याची टिका केली जात आहे. हे खरे तर

# आमची वसई तर्फे जागतिक योग दिवस साजरा

**वसई, दि. २३ : प्रतिनिधी**

जागतिक योग दिनानिमित्त नालासोपारा येथील कॅपिटल मॉल येथे डिकथलॉन, अद्भुत योग व आमची वसई तर्फे जागतिक योग दिवस साजरी करण्यात आला. मनुष्य जीवनात शारीरिक स्वास्थ्या बरोबरच मानसिक स्वास्थ्य उत्तम असणे देखील तितकेच आवश्यक आहे. मन तणावमुक्त व शरीर सुदृढ असेल तर मानवी आयुष्यातील प्रत्येक वळण उत्तमरीत्या हाताळत प्रत्येक क्षेत्रात आपण यशस्वी होऊ शकतो. यासाठी योग व ध्यान महत्वपूर्ण भूमिका बजावतात. आजच्या धकाधकीच्या जीवनात आपण स्वतःसाठी वेळच देत नाही व मग तणाव-रोग, Lifestyle Diseases बळावतात त्यामुळे आपसूकच आर्थिक, शारीरिक, मानसिक, कौटुंबिक व सामाजिक समस्या वाढू लागतात. सुखी आयुष्यासाठी बालक, विद्यार्थी, महिला, युवक, व्यावसायिक, गरोदर महिला, रुग्ण, ज्येष्ठ नागरिक सर्वच आबालवृद्धांना योग-ध्यान



करणे अत्यावश्यक आहे. योगाचे महत्त्व आता जागतिक स्तरावर संयुक्त राष्ट्र संघ व भारत सरकारने ही जाणले आहे, म्हणून २१ जून रोजी जगभर योग दिवस साजरा केला जातो. प्रदूषण, गुंतागुंतीचे मानवी संबंध, दूषित अन्नपाणी, व्यावसायिक तणाव, शासकीय तणाव, भाषा- प्रांत - आर्थिक संघर्षाने त्रस्त, निराशा झेलणाऱ्या एकवीसाव्या शतकातील मानवाला या प्राचीन योग-ध्यानाने एक सुखद जीवन मिळू शकते अशी आशा Yoga For Harmony And Peace या संयुक्त राष्ट्र संघाच्या व भारत सरकारच्या घोषवाक्याने मिळते, असे मत आमची वसई सामाजिक संस्थेचे अध्यक्ष पं. हृषीकेश वैद्य यांनी व्यक्त केले.

## ऑनलाईन ट्रेडिंगच्या नावाखाली 55 लाखांचा गंडा

**भाईंदर, दि. २३ : प्रतिनिधी**

ऑनलाईन शेअर मार्केटींगमध्ये गुंतवणूक केल्यास जादा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून शैलेश अमरदेव सिंग यांना ५५ लाख रुपयांचा गंडा घातल्याप्रकरणी काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ऑनलाईन शेअर मार्केटींग कंपनीचे गुंतवणूक सल्लागार असल्याची बतावणी करत केशवी गौर आणि अजय ठाकूर यांनी शैलेश सिंह यांना आमच्या कंपनीचे अप डाऊनलोड करुन गुंतवणुक केल्यास जादा परतावा मिळेल, असे आमिष दाखवले होते. त्यानुसार सिंह यांनी ५५ लाख रुपयांची गुंतवणूक केली.

कुळगांव बदलापूर नगरपरिषद

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व) कुळगांव, पिन-४२१५०३, ता.अंबरनाथ जि.ठाणे.

ईमेल:- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in. वेबसाईट:- https://kbmc.gov.in

जा.क्र : कुबनप/ई.गव्ह/१९५/२०२४-२५ दिनांक:- २३/०६/२०२५

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेचे कामकाज हे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती, व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ तसेच राज्यशासन व केंद्र शासनाकडील विविध शासन निर्णय, आदेश यानुसार करण्यात येते. त्यानुसार निवडणूक विषयक कामकाज करणेकरिता एजन्सी नियुक्त करणेकरिता महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून २४/०६/२०२५ ते दि. ३०/०६/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत दरपत्रक मागविण्यात येत आहे. तसेच सदरची निविदा दि. ०१/०७/२०२५ रोजी दुपारी तीन वाजल्यानंतर अथवा प्रशासकीय सोईनुसार उघडण्यात येईल.

सही/-
मुख्याधिकारी
कुळगांव बदलापूर नगरपरिषद
कुळगांव

मुख्य कार्यालय, विरार
विरार (पूर्व),
ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०५.

दूरध्वनी : ०२५० - २५२५१०१ / ०२/०३/०४/०५/०६
फॅक्स: ०२५० २५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./मु.विद्युत/५४८/२०२५
दिनांक : २३/०६/२०२५

ई-निविदा सुचना क्र. ०५ (२०२५-२०२६)

सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात महानगरपालिका मालकीचे रुग्णालये, आरोग्य केंद्र, CFC सेंटर, सार्वजनिक वाचनालय, विभागीय कार्यालय व इतर कार्यालयीन इमारती मध्ये नव्याने इन्व्हर्टर व बॅटरी बसविणे करीता निविदा सुचना व निविदा प्रपत्र https://mahatenders.gov.in या शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर दि. २४/०६/२०२५ पासून उपलब्ध होणार आहे.

निविदेबाबत सूचना व शुद्धीपत्रक असल्यास https://mahatenders.gov.in या शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेंत येईल.

सही/-
(अमोल जाधव)
प्र. कार्यकारी अभियंता (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

जावक क्र.व.वि.श.म./मा.व.ज./२६३/२०२५
दिनांक: २३/०६/२०२५

## कॉईन खरेदीत नफ्याच्या आमिषाने लाखोंचा गंडा

**भाईंदर, दि. २३ : प्रतिनिधी**

कॉईन खरेदी केल्यास जादा परतावा मिळेल, असे आमिष दाखवून ५८ लाख ७५ हजार रुपयांचा गंडा घातल्याचा प्रकार भाईंदरमध्ये उजेडात आला आहे. रवि महासेठ, रुपा महासेठ, अभिषेक साहू, अक्षय कदम आणि राजू सिंग यांनी मीरारोड येथील जीसीसी क्लबमध्ये बोलावून भाईंदरमध्ये राहणाऱ्या नाजरेथ परेरा या इस्टेट एजंटला कॉईन खरेदीत मोठा मिळवून देऊ, असे आमिष दाखवून आपल्या जाळ्यात ओढले होते. त्यांच्या भूलथाप्पांना बळी पडून परेरा यांनी ६० लाख रुपये जमा केले होते. त्यावेळी कॉईनचा रेट चार रुपयांपासून ६० रुपयांपर्यंत दाखवण्यात आला होता. वीस महिन्यांचा लॉकींग पिरीयड संपल्यानंतर परेरा यांना कॉईनचा रेट ४० पैसे दाखवण्यात. याप्रकरणी परेरा यांनी रवि महासेठ याच्याकडे विचारणा केली असता त्याने प्रथम उडवाउडवीची उत्तरे दिली होती. परेरा यांनी पाठपुरावा केला असता राजू सिंगच्या मार्फत १ लाख २५ हजार रुपये देण्यात आले. उर्वरित ५८ लाख ७५ हजार रुपये टाळाटाळ सुरु केली. परेरा यांनी याटोळीचा माहिती काढली असता त्यांच्याविरोधात अशाच प्रकारच्या फसवणुकीचे वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असल्याचे समजले. तेव्हा परेरा यांनी काशिगाव पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यावर पोलिसांनी रवी महासेठ, रुपा महासेठ, अभिषेक साहू, अक्षय कदम आणि राजू सिंग यांच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

# बुलेट ट्रेनचा राज्यातील पहिला गर्डर बसवण्यात यश

**डहाणू, दि. २३ : प्रतिनिधी**



नॅशनल हाय-स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (एनएचएसआरसीएल) ने मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्गाच्या महाराष्ट्र विभागातील डहाणू तालुक्यातील साखरे गावात 40 मीटर लांबीचा पहिला पूर्ण लांबीचा प्री-स्ट्रेस्ड कॉँक्रीट (पीएससी) बॉक्स गर्डर यशस्वीरित्या बसवला आहे.

प्रत्येक 40 मीटर लांबीचा पीएसकी बॉक्स गर्डर सुमारे 970 मेट्रिक टन वजनाचा असतो. ज्यामुळे तो भारताच्या बांधकाम क्षेत्रातील सर्वात जड गर्डर ठरतो. हे गर्डर्स कोणतेही बांधकाम सांधे न ठेवता, एकसंध स्वरूपात घडवले जातात. प्रत्येक गर्डरसाठी 390 घनमीटर कॉँक्रीट आणि 42 मेट्रिक टन स्टील वापरले जाते.

फुल-स्पॅन गर्डर्सना बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी प्राधान्य दिले जाते. कारण ते सेग्मेंटल गर्डर्सपेक्षा सुमारे 10 पट जलद गतीने बांधकाम पूर्ण करण्यास मदत करतात. पूर्ण लांबीचे प्री-कास्ट बॉक्स गर्डर्स विशेष स्वदेशी अवजड यंत्रसामग्रीद्वारे बसवले जात आहेत. ज्यामध्ये स्ट्रॅडल कॅरिअर्स, ब्रिज लॉन्चिंग गॅन्ट्रीज, गर्डर ट्रान्सपोर्टर्स आणि लॉन्चिंग गॅन्ट्रीज यांचा समावेश आहे. अखंड पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी हे गर्डर्स आधीच तयार करून समर्पित कास्टिंग यार्डमध्ये नियोजनबद्ध पद्धतीने साठवले जात आहेत.

शिळफाटा ते गुजरात-महाराष्ट्र सीमेपर्यंतच्या मार्गिकेवर एकूण 13 कास्टिंग यार्ड्स नियोजित करण्यात आले आहेत. त्यापैकी सध्या 5 यार्ड्स कार्यान्वित आहेत. ही सिद्ध तंत्रज्ञान प्रणाली एप्रिल 2021 पासून बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी वापरात आहे आणि गुजरातमध्ये एकूण 307 किमी लांबीचा व्हायाडक्ट पूर्ण करण्यात यामुळं मोठा वाटा उचललेला आहे. अलिकडील महत्त्वाच्या टप्प्यांमध्ये विरार आणि बोईसर स्थानकांवरील पहिल्या स्लॅबच्या कास्टिंगचा समावेश आहे.

बुलेट ट्रेन राज्यातील मार्ग 156 किलोमीटर लांब आहे. वांद्रे- कुर्ला कॉम्प्लेक्स (मुंबई) येथे एक भुयारी स्थानकाचा समावेश आहे. तर मुंबईतील वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स आणि ठाण्याच्या शिळफाटा दरम्यान 21 किमी लांबीचा बोगदा असणार आहे. शिळफाटा ते झरळी गाव (महाराष्ट्र-गुजरात सीमा) पर्यंत 135 किमी उंचावरील मार्गिकेचा, ज्यामध्ये समावेश आहे. बुलेट ट्रेनच्या राज्यातील मार्गात 2.3 किलोमीटर लांबीचे स्टील पुल, जे राष्ट्रीय महामार्ग, डीएफसीसी, भारतीय रेल्वे आणि उल्हास नदीवर बांधले जात आहेत. ठाणे, विरार आणि बोईसर येथील बुलेट ट्रेनच्या 3 स्थानकांमध्ये एकूण 1.3 किमी लांबीचा भाग आहे. तर सहा किलोमीटर लांबीचे सात डोंगरी बोगदे बुलेट ट्रेनसाठी तयार केले जात आहेत.

# मुसळधार पावसाने संरक्षण भिंत कोसळली

## सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निकृष्ट कामाचे फलीत



**मोखाडा, दि. २३ : प्रतिनिधी**

सार्वजनिक बांधकाम उपविभाग मोखाडा अंतर्गत मोखाड्यात रस्ते,पूल,संरक्षण भिंती अशी विविध विकास कामे केली जातात.संरक्षण भिंतीच्या कामाचा दर्जा मात्र निकृष्ट असल्याचे चित्र दिसून येत आहे. सध्या सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे डोल्हारा ते देवबांध दरम्यान गेल्यावर्षी बांधण्यात आलेली संरक्षण भिंत कोसळली आहे. ठेकेदार यांच्या काम करण्याच्या पद्धतीमुळे हा प्रकार असल्याचा आरोप केला जात आहे.

संरक्षण भिंतीत मोठ मोठे दगड, लाल गोटे त्याचप्रमाणे खालच्या दर्जाचे सिमेंट, गिरीट असल्यामुळे भिंती मजबूत होत नसल्याचा दावा करण्यात येत आहे.अशीच निकृष्ट कामे तालुक्यात होत असतील तर मोखाड्याचा विकास होईल का?, हा गंभीर प्रश्न समोर आला आहे.

संबंधित यंत्रणेने काम चालू असताना कामाची पाहणी का केली नव्हती. तसेच केली असेल तर ठेकदार यांना सूचना का दिल्या नाहीत?. असा सवाल जागरूक नागरिक करत आहेत. तसेच सखोल याप्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> संरक्षण भिंतीचे आरसीसी बांधकाम असून त्यात खूप प्रमाणात मोठ मोठी दगडे टाकून आणि खराब सिमेंट वापरून संरक्षण भिंत उभी केली जात असल्याने ती भिंत ही निकृष्ठ दर्जाची होते. त्यामुळेच वर्ष होत नाही तोच भिंती मुळासकट पडल्या जातात.ज्या एजंसीने काम केले आहे तिला काळ्या यादीत टाकावे तसेच शाखा अभियंता, उपभियंता यांच्यावर कारवाई देखील व्हावी.
>
> **- प्रदीप वाघ, माजी उपसभापती, पंचायत समिती मोखाडा**

# ‘क्वेस्ट’च्या ‘पालवी’ उपक्रमातून सकारात्मक बदलांची झलक

## जव्हार-मोखाडा अंगणवाडी सेविकांचे अनुभव

**पालघर, दि. २३ : प्रतिनिधी**

‘क्वेस्ट’ संस्थेच्या ‘पालवी’ उपक्रमांतर्गत आणि रोटरी क्लब ३१४१ यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता. पूर्व प्राथमिक शिक्षण समृद्ध करण्याच्या उद्देशाने ‘पालवी’ उपक्रम जिल्ह्यातील ५०० हून अधिक अंगणवाड्यांमध्ये राबवला जात आहे. कार्यक्रमात मोखाडा तालुक्यातील सप्रेवाडीच्या वंदना वरठा, जव्हार तालुक्यातील सडकपाडा येथील कल्पना गोरे, प्रभारी बालविकास प्रकल्प अधिकारी कल्पना भोये, आणि पर्यवेक्षिका सरला मेतकर यांनी आपले अनुभव अत्यंत आत्मीयतेने मांडले.

बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील एमसीए सभागृहात झालेल्या एका विशेष कार्यक्रमात जव्हार आणि मोखाडा तालुक्यांतील अंगणवाडी सेविकांनी 'पालवी' उपक्रमामुळे त्यांच्या कामात झालेल्या सकारात्मक बदलांचे अनुभव कथन केले. कल्पना भोये म्हणाल्या, “पूर्वी मुले अंगणवाडीकडे यायला नाखूष असायची. पण आता ‘पालवी’मुळे शिक्षणात रस निर्माण झाला असून, मुले आणि पालक दोघेही अंगणवाडीकडे आकर्षित होतात.” दोन्ही अंगणवाडी ताई आणि पर्यवेक्षिका यांनी मुलांच्या शिक्षणामध्ये झालेले बदल, तसेच त्यांच्या मध्ये निर्माण झालेला आत्मविश्वास सविस्तर उपस्थितांपुढे मांडला. पहिल्यांदाच मोठ्या व्यासपीठावर बोलणाऱ्या अंगणवाडी सेविकांनी स्वतःचा आत्मविश्वास आणि सामाजिक परिवर्तनातली त्यांची भूमिका प्रभावीपणे सादर केली.

कार्यक्रमाची आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, सभागृहातील प्रत्येक टेबलावर फुलांच्या सजावटीभोवती सप्रेवाडी व सडकपाडा अंगणवाड्यांतील मुलांचे आणि उपक्रमातील क्षणांचे छायाचित्र लावण्यात आले होते. या छायाचित्रांमधून ‘पालवी’चा परिणाम अनुभवायला मिळत होता, ज्यामुळे उपस्थित प्रत्येक व्यक्तीला त्या बदलाची प्रत्यक्ष जाणीव झाली.



सप्रेवाडी व सडकपाडा या अंगणवाड्यांनी जिल्ह्यातील ५०० अंगणवाड्यांचे प्रतिनिधित्व करत उत्कृष्ट कामाची झलक सादर केली. कार्यक्रमास क्वेस्ट संस्थेचे संचालक निलेश निमकर, विश्वस्त अनुपमा जोशी, सहसंचालक मिताली थत्ते, प्रकल्प व्यवस्थापक तुषार मराडे, रोटरी क्लब ३१४१ चे पदाधिकारी, तसेच उपक्रमाला निधी उपलब्ध करून देणारे रोटरी क्लबचे दाते उपस्थित होते. क्वेस्टच्या उपक्रमामुळे अंगणवाड्यांमध्ये केवळ पोषण नव्हे तर प्रभावी शिक्षणाचा पाया घातला जात आहे. खेळ, गाणी, संवाद, कृती याच्या माध्यमातून मुलांच्या सर्वांगीण विकासाला गती मिळत आहे. या कार्यक्रमातून अंगणवाडी सेविकांच्या कार्याचे प्रेरणादायी सादरीकरण आणि त्यांची सामाजिक भूमिकेची मान्यता अधोरेखित झाली.

# वाड्यात हिंदीच्या सक्तीविरोधात मनसे आक्रमक

**वाडा, दि. २३ : प्रतिनिधी**



शाळेत पहिलीपासून हिंदी भाषेच्या सक्तीवरून मनसे शासनाच्या विरोधात मैदानात उतरली आहे. शासनाने सक्ती केली तरीही शाळांमध्ये हिंदी सक्तीने शिकवले जाऊ नये, यासाठी तालुक्यातील मनसे पदाधिकाऱ्यांनी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी, शाळांच्या मुख्याध्यापकांना भेटून तिसऱ्या भाषेचा ताण टाळण्यासाठी हिंदी न शिकवण्याची मागणी केली आहे. अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

राज्य सरकारने शाळांमध्ये हिंदी भाषेची सक्ती करतात मनसेने त्याच विरोध दर्शवण्यास सुरुवात केली आहे. वाड्यातील मनसैनिकदेखिल आक्रमक झाले असून त्यांनी पहिल्यांदा पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांची भेट घेऊन हिंदीची सक्ती करू नये, अशी मागणी केली. जर हिंदीची सक्ती केली गेली तर मनसे स्टाईल आंदोलन केले जाईल, असा इशाराही दिली आहे. त्याचबरोबर वाड्यातील सर्वच शाळांनाही हिंदीची सक्ती न करण्याची तंबी दिली आहे.

मनसे वाडा तालुका अध्यक्ष कांतीकुमार ठाकरे, कामगार सेनेचे देवेंद्र भानुशाली, उप तालुका अध्यक्ष रवी जाधव, शहर सचिव विजय बोरसे, उपशहर अध्यक्ष अक्षय घोलवड, ओमकार साळुंखे, डाहे विभाग अध्यक्ष देवाशिष कांबेरे, मांडा विभाग अध्यक्ष प्रकाश धानवा, ओमकार पाडोसा, अजिंक्य मोकाशी आदी पदाधिकाऱ्यांनी हिंदी सक्तीविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे.

# अंबरनाथचे माजी उपनगराध्यक्ष अब्दुल शेख यांच्या हस्ते शौचालयाच्या कामाचे भूमीपूजन

**अंबरनाथ, दि. २३ : प्रतिनिधी**

गेल्या अनेक महिन्यापासून आपल्या परिसरात नवीन शौचालय उपलब्ध करून द्यावे अशी सातत्याने मागणी अंबरनाथ पश्चिमेकडील शास्त्रीनगर, स्वामीनगर परिसरातील रहिवासी करीत होते. या प्रमुख मागणीच्या अनुषंगाने स्थानिक मा. नगरसेवक व मा. उपनगराध्यक्ष अब्दुलभाई शेख यांनी पालिका प्रशासनाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा करीत शास्त्रीनगर,स्वामीनगर परिसरातील टॅक्सपेयर असणाऱ्या गोरगरीब कुटुंबातील नागरिकांकरिता शौचालय बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला. त्या नवीन शौचालयाच्या कामाचे भूमिपूजनाचा कार्यक्रम नुकताच आयोजित करण्यात आला होता. त्या परिसरातील स्थानिक मा. उपनगराध्यक्ष व स्थानिक मा. नगरसेवक अब्दुलभाई शेख यांच्या शुभहस्ते श्रीफळ फोडुन त्या नवीन शौचालय बांधण्याच्या कामाच भूमिपूजन सोहळा संपन्न झाला.

त्यावेळी उपस्थित असणाऱ्या परिसरातील महिला वर्गासह परिसरातील स्थानिक नागरिक यांच्या हस्ते विविध पूजा करून श्रीफळ फोडत या कामाचा भूमिपूजन सोहळा संपन्न झाला. सदर प्रसंगी शिवसेना शाखाप्रमुख व्यंकटेश तसेच जीवा, मैदर ,आझाद, मुबारक, अजय, आयप्पन, रणजीत, मनी, संजू, अजित, रमेश, देवा, रामचंद्र, चुनरसू ,शिवा, कार्तिक मोहन, मुरगण तसेच शिवसेना पदाधिकारी , स्थानिक नागरिक व परिसरातील अनेक माता भगिनी या कार्यक्रमाला उपस्थित होते. प्रभागाचे मा. नगरसेवक ,मा. उपनगराध्यक्ष अब्दुलभाई शेख यांनी पालिका प्रशासनाकडून सातत्यपूर्ण पाठपुराच्या अनुषंगाने नवीन शौचालय उपलब्ध करून घेतल्या बाबत व परिसरातील अतिशय महत्त्वाचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल स्थानिक नागरिकांनी त्यावेळी अब्दुलभाई शेख यांचे विशेष आभार प्रकट केले. अब्दुलभाई शेख यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले शिवसेनेचे ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या मूलभूत तत्वाच्या अनुषंगाने अंबरनाथ नगरपरिषदचे टेक्सपेयर असणाऱ्या गोरगरीब बांधवांसाठी तसेच अतिशय महत्त्वपूर्ण शौचालय ही नागरिक मूलभूत सुविधा उपलब्ध होईल या करिता नगरपालिका प्रशासन यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केल्याचे त्यांनी विशेष नमूद केले. तसेच राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री व शिवसेनेचे सर्वोच्च नेतृत्व एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली तसेच खासदार डॉ. श्रीकांत शिंदे व आमदार डॉ. बालाजी किणीकर यांच्या प्रमुख अधिपत्याखाली असे व इतर अनेक लोकोपयोगी उपक्रम सातत्यपूर्ण स्वरूपात राबवण्याचा मानस देखील या वेळेस अब्दुलभाई शेख यांनी व्यक्त केला आहे.

# शांतीदुत परिवार संस्थेच्यावतीने समीर चौघुले यांना सेवा रत्न पुरस्कार

**भिवंडी, दि. २३ : प्रतिनिधी**



संपूर्ण महाराष्ट्रात सामाजिक कार्य करणाऱ्या " शांतीदुत परिवार " या संस्थेच्या माध्यमातून नुकताच महाराष्ट्राची हास्यजत्रा व सम्या सम्या मैफिलीत माझ्या " फेम सुप्रसिद्ध अभिनेते समीर चौघुले यांचा कला क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देत असल्यामुळे "शांतीदूत सेवा रत्न" पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.त्यामुळे मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.महाराष्ट्र शांतीदूत परिवाराचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्याचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ.विठ्ठलराव जाधव (सेनि) यांच्या हस्ते बालगंधर्व रंग मंदिर येथे नागरी सत्कार करण्यात आला.यावेळी शांतीदूत परिवाराचे पदाधिकारी प्रा इंद्रजीत भोसले,राष्ट्रीय महिला अध्यक्ष विद्याताई जाधव,तृषाली जाधव,शितल चौधरी,डॉ.योगेश्वरी कराळे,रोहिणी कोळेकर,प्रा.विलास कदम,मधुकर चौधरी,नितीन दुधाटे,मितेश भोसले,विजय ठुबे, व मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.महाराष्ट्र राज्य ही संताची भूमी आहे येथे नेहमी कलाकारांच्या गुणांना प्रोत्साहन दिले जात आहे. केंद्र व राज्य शासन नेहमी कलाकारांचा गौरव करत असते त्याच प्रमाणे शांतीदुत परिवार सुध्दा शालेय विद्यार्थी,होतकरू महिला, खेळाडू व कलाकारांचे गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी देण्यासाठी नेहमी सक्रिय असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष डॉ. विठ्ठलराव जाधव यांनी या कार्यक्रमात दिली. झालेल्या भव्य सत्कार सोहळा कार्यक्रमात कला क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देत असल्याबद्दल शांतीदूत सेवा रत्न पुरस्कार देऊन

समीर चौघुले यांचा गौरव करण्यात आला. कोविड च्या भयंकर तणावाच्या काळात सचिन खेडेकर तसेच समीर चौघुले व त्यांच्या संपूर्ण हास्यजत्रा कलाकार रसिकांना मदत व आनंदाचे क्षण उपलब्ध करून दिले.त्यामुळे त्यांचे व संपूर्ण टीम चे हे ऋण अविस्मरणीय आहेत असे गौरव उद्गगार जाधव यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने महिला व नागरिकांसह शांतीदुत परिवाराचे सदस्य पदाधिकारी उपस्थित होते.

# अंबरनाथमध्ये शिवसेनेकडून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**अंबरनाथ, दि. २३ : प्रतिनिधी**

अंबरनाथमध्ये शिवसेना शिंदे गटाच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य आणि ज्येष्ठ नागरिकांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले आहे . शिवसेना शहरप्रमुख अरविंद वाळेकर आणि शिवसेना शहरशाखेच्या माध्यमातून हे वाटप करण्यात आले असून यावेळी सुमारे ५ हजार विद्यार्थी आणि २ हजार ज्येष्ठ नागरिकांनी याचा लाभ घेतला असल्याची माहिती श्री वाळेकर यांनी दिली आहे. ंबरनाथ शिवसेना शहर शाखेच्या माध्यमातून मागील अनेक वर्षांपासून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचं वाटप केलं जाते सोबतच ज्येष्ठ नागरिकांना छत्र्याचे वाटप केले जात आहेत . यंदाच्या वर्षीही शहर शाखेच्या वतीने सुमारे ५ हजार विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचं वाटप करण्यात आले. यात दप्तर, वह्या, पाण्याची बाटली, कंपास पेटी इतर शालेय साहित्य विद्यार्थ्यांना देण्यात आले आहे . तसेच दोन हजार ज्येष्ठ नागरिकांना मोफत छत्र्या वाटण्यात आल्या. अंबरनाथच्या शिवसेना शहर शाखेबाहेर हा कार्यक्रम पार पडला. यावेळी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या शिकवणीचं पालन करत आम्ही अनेक वर्षांपासून अंबरनाथमध्ये हा कार्यक्रम राबवत असल्याची माहिती शिवसेना शहरप्रमुख अरविंद वाळेकर यांनी दिली आहे . या वेळी शिवसेना शहरप्रमुख अरविंद वाळेकर, माजी नगराध्यक्षा मनीषा वाळेकर, माजी नगरसेवक राजू शिर्के, पद्माकर दिघे, निखिल वाळेकर, ज्येष्ठ शिवसैनिक रुपसिंग धल, भूषण वाळेकर, माजी शहर संघटक नीता परदेशी, पूनम येरूणकर, चंदा गान, जयश्री गुप्ता, सुप्रिया मालुसरे, उर्मिला कदम, सोनाली मांढरे, संजय सावंत, शिवाजी गायकवाड, बाळा मालुसरे, महेश वाळुंज, किशोर सोरखादे, स्वप्नील जावीर, योगेश गोरे, दीपक पवार यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# गोमांस सदृश हाडांची वाहतूक करणाऱ्या चालकासह दोघांना अटक

**भिवंडी, दि. २३ : प्रतिनिधी**

ट्रकमधून गोमांस सदृश हाडांची वाहतूक करणाऱ्या दोघांना शहर पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली आहे.सलीम रफिक कुरेशी (३० रा.भिवंडी) आणि चालक अबु सौद इकबाल अहमद अंसारी (३५ रा.नाशिक) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सलीम व इकबाल या दोघांनी आपसात संगनमताने ट्रक क्र.एमएच १६ एई ४०५९ मध्ये गोमांस सदृश हाडे कोंबून त्यांची विक्री करण्यासाठी गुजरात ते भिवंडी वाहतूक करीत असल्याची खबर पोलिसांना मिळाली होती, त्यानुषंगाने शहर पोलिस पथकाने २१ जून रोजी रात्री दीड वाजताच्या सुमारास धामणकर येथील रस्त्यावर समोर सापळा रचला असता ट्रकची झाडाझडती घेतली.त्यावेळी ट्रकमध्ये गोमांस सदृश हाडे आढळून आली आहेत.त्यामुळे याप्रकरणी पोशि विजय लालचंद पाटील यांच्या फिर्यादीवरून दोघांवर महाराष्ट्र पशु संरक्षण कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून दोघांनाही बेड्या ठोकल्या आहेत.या घटनेचा पुढील तपास पोउनि ललित केदारे करीत आहेत.



**शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने पनवेल मधील व्ही के हायस्कूलमध्ये दिनांक २२ जून २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात १४७ रक्तदात्यांनी रक्त देऊन समाजाप्रती असलेले आपले कर्तव्य पार पाडले. सदर रक्तदान शिबिराचे उद्धाटन माजी आमदार बाळाराम पाटील, पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती काशिनाथ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक शंकर शेठ म्हात्रे, गोपाळ शेठ भगत, प्रमोद भगत, कृषी उत्पन्नशेकाप आयोजित रक्तदान शिबिरात १४७ रक्तदात्यांनी रक्त रक्तदान केले.**

# कल्याण, अंबरनाथ, बदलापूर आणि उल्हासनगरच्या सर्व रोटरी क्लब्सनी मिळून केली ग्रीन आर्मीची स्थापना

**उल्हासनगर, दि. २३ : प्रतिनिधी**

कल्याण, अंबरनाथ, बदलापुर व उल्हासनगर येथील सर्व रोटरी क्लब मिळुन ग्रीन आर्मीची स्थापना केली असुन ही आर्मी या चार ही शहरात वृक्षारोपण अभियान राबवणार असल्याने हे रोटरी क्लब एकत्र आले आहेत .

दरम्यान महत्त्वपूर्ण पर्यावरणीय उपक्रमांतर्गत कल्याण, अंबरनाथ, बदलापूर आणि उल्हासनगर (केएबीयू) च्या सर्व रोटरी क्लब्सनी मिळून एक ग्रीन आर्मीची स्थापना केली आहे, जी आपापल्या क्षेत्रात वृक्षारोपण करण्यासाठी कटिबद्ध असणार आहे. या अभियानाचा उद्देश पर्यावरणावर कायमस्वरूपी प्रभाव टाकणे, हिरवळ वाढवणे आणि पारिस्थितीक संतुलन मजबूत करणे हा आहे.

या अभियानाचे नेतृत्व रोटेरियन गोवर्धन गोलानी हे करणार असुन त्यांची अध्यक्ष म्हणुन निवड केली आहे . रोटेरियन गुल अडवानी समन्वयक असुन सर्व रोटरी जिल्हा अधिकारी हे पदावर असणार आहेत. जे हे पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. तर वृक्षारोपणाच्या तारखा लवकरच निश्चित केल्या जातील, आणि यात रोटेरियन, स्थानिक रहिवासी, एनसीसी, स्काऊट आणि पर्यावरण कार्यकर्त्यांच्या उत्साही सहभागाची अपेक्षा आहे.

३००० रोपे घेऊन वृक्षारोपण अभियान वन विभागाच्या मदतीने केले जाणार असुन शाळा, कॉलेज, रुग्णालय, बाग आणि नदीकिनारे निवडले जातील. दरम्यान रोपणकर्ता आपल्या नावाने व कुटुंबाच्या नावाने झाडे लावू शकतो, झाडे मोफत उपलब्ध करून दिली जातील, रोटरी क्लबद्वारे रोपणकर्त्याकडून एक हमीपत्र घेतले जाईल की तो झाडांची काळजी घेईल, अशी माहिती रोटरी क्लबचे डॉ. राजू उत्तमानी, गुल आडवाणी, गोवर्धन गोलानी, हरीश कृपलानी, मनु बुधरानी यांनी दिली आहे.

